आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१३ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- महायुतीचं सरकार आल्यावर महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर येईल, असा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचा विश्वास

- महायुतीचं सरकार जनतेला खोटी आश्वासनं देऊन फसवणूक करत असल्याची काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची टीका

- झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६५ टक्के मतदान

- विद्यार्थी आणि पालकांची दिशाभूल रोखण्यासाठी कोचिंग संस्थांसाठी मार्गदर्शक तत्त्व जाहीर

**आणि**

- IFFI मध्ये सुवर्ण मयुर पुरस्कारासाठी १५ चित्रपटांमध्ये स्पर्धा, रावसाहेब या मराठी चित्रपटासह आर्टिकल ३७० चाही समावेश

**<><><><><>**

महायुतीचं सरकार राज्यात असेल तर महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर येण्यापासून कुणीही रोखू शकणार नाही, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज धुळे इथं व्यक्त केला. लांगुलचालनाच्या भावनेने पछाडलेल्या महाविकास आघाडीने देशाच्या सुरक्षेला वेठीला धरल्याची टीकाही शहा यांनी यावेळी केली. मात्र, केंद्रातल्या सरकारचं देशाच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य आहे. काँग्रेसने मात्र प्रगतीत अडथळे आणले. काँग्रेसच्या आरक्षणासंदर्भातल्या धोरणावर टीका करताना अमित शहा म्हणाले…

**होल्ड बाईट - अमित शहा**

२००४ ते २०१४पर्यंत काँग्रेसने राज्याला १ लाख ९१ हजार कोटी रुपयांचा निधी दिला तर त्यानंतर आलेल्या भाजपाशासित सरकारने हीच रक्कम १० लाख १५ हजार ८९० कोटी रुपयांपर्यंत वाढवली, असं ते चाळीसगावमधल्या सभेत म्हणाले. कोरोना काळातल्या माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वर्तवणुकीवरही त्यांनी टीका केली. राज्यात महायुतीचं सरकार आल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेल्या किल्ल्यांच्या संवर्धनासाठी दोन हजार कोटी रुपयांची तरतूद केली जाईल, असं आश्वासन शहा यांनी परभणी इथं झालेल्या प्रचारसभेत दिलं.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीचा निकाल आल्यानंतर, अजित पवार यांच्याशिवाय कोणतंही सरकार राज्यात स्थापन होऊ शकणार नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री नवाब मलिक यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते.

भाजपासोबत राष्ट्रवादी काँग्रेसनं राजकीय तडजोड केली आहे, मात्र शिव - शाहू - फुले - आंबेडकर यांच्या विचारधारेवर राष्ट्रवादी काँग्रेस ठाम आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निवडणूक जाहिरातीत संस्थापक शरद पवार यांच्या नावाचा उल्लेख वारंवार का केला जातो अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार यांच्या पक्षाकडे केली आहे. अजित पवार यांच्या पक्षाने निवडणुकीसाठी शरद पवार यांच्या नावावर अवलंबून राहू नये असा सल्लाही न्यायालयानं दिला.

**<><><><><>**

राज्यातलं महायुतीचं सरकार जनतेला खोटी आश्वासनं देऊन फसवणूक करत असल्याची टीका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज लातूर इथल्या प्रचारसभेत केली. केंद्रातलं भाजपा सरकार शेतमालावर जीएसटी लावून शेतकऱ्यांची लूट करत आहे, सोयाबीन आणि कापसाच्या हमीभावात वाढ केली जात नाही अशी टीका खर्गे यांनी केली. सोयाबीनला ६ हजार रुपये हमीभाव देऊ, असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं होतं. मात्र ते पाळलं नाही, असा आरोप करत महायुतीचं फसवं सरकार उलथून टाकून महाविकास आघाडीला विजयी करा, असं आवाहन मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलं.

**होल्ड बाईट खर्गे**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राज्यात ३ प्रचार सभा घेणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये दुपारी, नवीमुंबई आणि मुंबईत शिवाजीपार्कवर संध्याकाळी ते सभा घेणार आहेत.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी उद्या दुपारी नंदूरबारमध्ये आणि त्यानंतर नांदेडमध्ये प्रचारसभेला संबोधित करतील. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे दुपारी नाशिक जिल्ह्यात इगतपुरीत आणि संध्याकाळी पुण्यात प्रचार सभा घेणार आहेत.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या सोलापूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

<><><><><>

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यापासून विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ५१९ कोटी ७५ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. यात रोख रक्कम, दारू, अंमली पदार्थ, मौल्यवान धातू इत्यादी मुद्देमालाचा समावेश आहे. २०१९च्या विधानसभा निवडणुकीच्या काळात जप्त केलेल्या मुद्देमालाच्या किंमतीच्या तुलनेत ही किंमत ६३ कोटी रुपयांपेक्षाही जास्त आहे. तर २०१४ च्या तुलनेत यात जवळपास सात पटींपेक्षा जास्त वाढ झाली आहे.

या कालावधीत सी-व्हिजिल ॲपवर आचारसंहिता भंगाच्या ५ हजार ९०२ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यापैकी ५ हजार ८६३ तक्रारी निकालात काढल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी ६५ पूर्णांक ३ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली आहे. १५ जिल्ह्यातल्या ४३ विधानसभा मतदारसंघांमधे आज मतदान झालं. ३१ विधानसभा मतदार संघातल्या ९५० अतिसंवेदनशील मतदान केंद्रांमध्ये चार वाजेपर्यंत मतदान सुरू होतं. माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे उमेदवार चंपाई सोरेन, राज्यसभा सदस्य महुआ माझी, काँग्रेस नेते रामेश्वर ओराओ आदि नेत्यांचं भवितव्य आज मतपेटीत बंद झालं.

याशिवाय देशातल्या १० राज्यातल्या मिळून ३१ विधानसभा मतदारसंघांमधे पोटनिवडणुकीसाठीही आज मतदान झालं. राजस्थानातल्या सात, पश्चिम बंगालमधल्या सहा, आसाममधल्या पाच, बिहारच्या चार, कर्नाटकातल्या तीन, तर मध्य प्रदेशातल्या दोन विधानसभा जागांवर उमेदवारांचं भविष्य मतपेटीत

बंद झालं. तसंच केरळ, छत्तीसगड, गुजरात आणि मेघालय या राज्यातही प्रत्येकी एका जागेसाठीही मतदानाची प्रक्रिया आज पार पडल्या.

**<><><><><>**

केरळ मधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीत ६० पूर्णांक ७९ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे झालेल्या या पोटनिवडणुकीत प्रियांका गांधी रिंगणात आहेत.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांची आणि पालकांची दिशाभूल रोखण्यासाठी, सर्व कोचिंग संस्थांसाठी केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं आज सर्वंकष मार्गदर्शक तत्वं जारी केली. विविध शिकवणी वर्गांकडून दिल्या जाणाऱ्या, दिभाभूल करणाऱ्या जाहीरातींविरोधात केंद्रीय ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी आज नवी दिल्ली इथं ही मार्गदर्शक तत्वं जारी केली.

या संस्थांनी त्यांचे विद्यार्थी आणि अभ्यासक्रमांशी संबंधित माहिती जाहीर करावी, या वर्गांच्या कार्यपद्धतीबाबतची स्पष्टीकरणं ठळकपणे प्रदर्शित करावीत, विद्यार्थ्यांची छायाचित्रं आणि त्यांची माहिती वापरण्यासाठी त्यांची संमती घ्यावी, आपल्याकडच्या सेवा, सुविधा आणि पायाभूत सुविधांची अचूक माहिती जाहीर करावी, असं त्यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नवनवीन नियुक्त्या करायला सुरुवात केली आहे. माजी लष्करी पेट हेगसेठ हे अमेरिकेचे नवे संरक्षण मंत्री असतील. माइक वाल्टझ यांची अमेरिकेचे आगामी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार

म्हणून ट्रम्प यांनी नियुक्ती केली आहे. जॉन रॅटक्लिफ यांना CIA चं संचालक म्हणून नेमलं आहे.

**<><><><>**

जगभरातल्या सर्वोत्तम कथानक मांडणाऱ्या चित्रपटाला दिल्या जाणाऱ्या सुवर्ण मयूर पूरस्कारसाठी IFFI अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात १५ चित्रपट एकमेकांना टक्कर देणार आहेत.  यामध्ये भारताच्या, द गोट लाईफ या मल्याळम भाषेतल्या, आर्टिकल ३७० या हिंदी आणि रावसाहेब या मराठी चित्रपटांचा समावेश आहे.

रावसाहेब या मराठी चित्रपटात जितेंद्र जोशी मुख्य भूमिकेत असून राष्ट्रपती पुरस्कार विजेते निखिल महाजन यांनी चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.

**<><><><>**

गेमिंग, ॲनिमेशन आणि मनोरंजन क्षेत्रातल्या नव्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी सांगितलं. याचं हेतूने सरकारने आयआयसीटी अर्थात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीजची स्थापना केली आहे, असं ते म्हणाले. हैदराबाद इथं इंडिया गेम डेव्हलपर कॉन्फरन्सच्या उद्घाटन सत्रात ते आज बोलत होते. आयआयसीटी ही संस्था सार्वजनिक-खासगी प्रारुपानुसार काम करेल. यात ५२ टक्के भागीदारी ही FICCI आणि CII ची तसंच ४८ टक्के भागीदारी सरकारची असेल असं जाजू यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**